# मातीवरील प्रक्रिया एक महाउद्योग

**डॉ. नितिन बी. कावडकर,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस, जि. चंद्रपूर. **४४२५०५**

**प्रस्तावना :** भारतात अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक जाती आणि अनेक पंथ आहेत. समाजाची रचना ही कामाची विभागणी विचारात घेवून केलेली आहे. उदा. कुंभार, लोहार, सुतार, न्हावी, शिंपी, सोनार इ. मातीची मडकी बनविणारा कुंभार, लोखंडाचे काम करतो तो लोहार, लाकडी वस्तू बनविणारा सुतार, हजामत करणारा न्हावी, कपडे तयार करणारा शिंपी, सोन्याचे काम करणारा सोनार, बांबूपासून वस्तू बनविणारा बुरड ही व्यवसायिक नावे आहेत. मातीची विविध भांडी बनविणारा समाज म्हणजे 'कुंभार कामगार' होय. 'कुंभार' ह्या शब्दात 'कुंभ' आणि 'कार' असे दोन शब्द आहेत. कुंभ म्हणजे 'मातीची घागर' आणि कार म्हणजे 'बनविणारा' (कारागीर) यावरूण कुंभार कामगार असा अर्थ घेतलेला आहे.

**कुंभार उद्योग :**कुंभार उद्योग या संज्ञेने कुंभारकाम म्हणजे मडकी, घागरी, कुंड्‌या, कौले, विटा, फरश्या, रांजण, पणत्या, गंगार इत्यादी मातीच्या वस्तू बनविण्याचा व भाजून त्या पक्या करण्याच्या धंदा असा अर्थ अभिप्रेत आहे. इंग्रजी भाषेत 'सेरॅमिक्स' ह्या शब्दाचा अर्थ भाजलेली वस्तू होय. हा शब्द या अर्थाच्या ज्ञम्तंडवै या ग्रीक शब्दावरून आलेला आहे. त्यामुळे मानवी संस्कृतीच्या सुरवातीच्या काळात काळ्या अथवा लाल मातीच्या बनविलेल्या व भट्‌टीत भाजून काढलेल्या वस्तू तयार करण्याचा धंदा असाच या संज्ञेचा अर्थ केला जात असे. आजही पुरातत्वविद्येच्या संदर्भात असाच अर्थ घेतला जातो, परंतु इतरत्र या संज्ञेची व्याप्ती पुष्कळच वाढली आहे. खेड्‌यातील कुंभार जवळपास मिळणाऱ्या शेतातील, तलावातील अथवा नदीकाटची माती थोड्‌याफार कमावून साध्या सुध्या यंत्र सामुग्रीने मडकी, माठ, विटा, कौले इ. सामान्य वस्तू ग्राम उद्योगाच्या पातळीवर बनविणे, त्याचे मुख्य यांत्रिक साधन म्हणजेच चाक व साचे, याशिवाय वस्तुची जाडी ठिकठाक करून घेण्यासाठी चोपणे नावाची एक लहानशी हातोळी, बहीर्गोल आकाराचा एक दगड किंवा गंडा व वस्तुला चकाकी आणण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या मण्यांची एक माळ, शिपले आणि बांबूचा तुकडा ही इतर साधने तो वापरतो. वस्तू बनविण्यासाठी कुंभार प्रथम चाकावर थोडी माती पसरून तिच्यावर योग्य आकार देण्यासाठी प्रथम त्याचा गोळा तयार करतो. त्यानंतर आपल्या हाताच्या बोटांनी व अंगट्‌यानी गोळ्याला क्रमाक्रमाने आतून व बाहेरून आकार देतो. त्यानंतर वस्तू चाकावरून उतरवून सावलीमध्ये वाळवितात. गंडा व चोपने याचा वापर वस्तू बनवितांना ते करतात. आतील बाजूचा भाग योग्य करण्यासाठी गंडा वापरतात व वरील भाग चोपण्याने ठोकतात. गंडा व चापणे यांचा कुशलतेने वापर करून वस्तूला योग्य आकार देतात.

कित्येक कुंभार दिवाळी, पोळा इ. सणांसाठी बैल, गाय, हत्ती घोडे, शिपाई इत्यादींचे साचे तयार करून वस्तू बनवितात. दिवाळीच्या पणत्या चाकावरच तयार करतात, तयार केलेल्या वस्तू भाजण्याकरीता आवा किंवा भट्‌टी लावतात. लाकडे, कोळसा इत्यादीचा वापर करून भट्‌टी लावली जाते. विशिष्ट तापमान झाले की मातीच्या वस्तू लाल बनतात त्यानंतर भट्‌टी थंडी करून वस्तू बाहेर काढतात. कुंभार कलेची ही साधारण वैशिष्टये आहेत.उपभोगाच्या प्रक्रियेतून उत्पादनाची प्रक्रिया सुरू होते हे अर्थशास्त्राचे मुख्य तंत्र आहे. वस्तुची आवश्यकता असल्याशिवाय ती वस्तू निर्माण केल्या जात नाही. याला मातीच्या वस्तू अपवाद नाही. भारतीय संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती असून एक विशिष्ट असा वारसा असलेली संस्कृती आहे. परंपरेनुसार यात विविध वस्तूला फार धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे. बऱ्याच धार्मिक प्रसंगी मातीच्या वस्तू आजही ग्रामीण आणि शहरी भागात वापरल्या जातात. दिवाळी, आठवी, पोळा, लग्नप्रसंगी, अंत्यविधीप्रसंगी मातीच्या वस्तू तसेच धार्मिक सण साजरे करताना तसेच विविध सणाच्या प्रसंगी मातीच्या मूर्ती तयार करून तो-तो सण साजरा करतात. उदा. जन्माष्ठमीला कृष्णाची मुर्ती, गणेशचतुर्थीला गणपतीची मुर्ती इ. तसेच फार पूर्वीपासून दुग्ध व्यवसायात दुध व्यवस्थीत राहण्यासाठी मातीच्या मळक्यांचा वापर केला जातो. उन्हाळ्‌यात पाणी थंड ठेवण्यासाठी मातीचे माठ वापरले जातात. गृहसजावट करण्याकरीता आधुनिक काळात मातीच्या विविध कलाकूसरीच्या वस्तू तयार करून अगदी दिवाण खाण्यापासून स्वयंपाक घरापर्यंत वापल्या जातात

**कुंभार कमगारांच्या उत्पत्ती संबंधी कथा/मत** :-कुंभार हा शब्द संस्कृत भाषेतील 'कुंभ' या शब्दापासून निर्माण झालेला आहे. कुंभ म्हणजे पाणी ठेवण्याचे भांडे होय. १९११ मध्ये कुंभार लोंकाची संख्या मध्य भारतात जवळपास १,२०,००० इतकी होती. त्यापैकी जास्तीत जास्त कुंभार लोक पूर्व किंवा हिंदुस्तानी भाषा बोलणाऱ्या जिल्हया मध्ये होती. जिथे दक्षिण भागापेक्षा मातीची भांडी जास्त प्रचलीत होती. कुंभार ही जात पुरातन जातींपैकी एक जात आहे. मातीची भांडी सुरवातीच्या काळात जास्तीत जास्त प्रमाणात वापरल्या जात होती. जुन्या हिंदू संस्कृतीत मिश्र विवाह पध्दतीत या जातीच्या निर्मिती बाबत चार वर्गात विभाजनाचे दाखले दिलेले आहेत. जातीच्या पंरपरागत अस्तीतत्वा विषयी सर. एच. रिस्ले लिहीतात "या विषयी मान्यता प्राप्त संशोधकांच्या मतामध्ये खूप तफावत आढळते. ब्रम्ह विवर्तक पुरान असे म्हणतो की, कुंभार किंवा पाणी ठेवण्याची भांडी बनविणारा याचा जन्म वैश्य स्त्रीच्या पोटी ब्राम्हण पित्याकडून झाला. परासर संहीतेनुसार पिता म्हणजे मलकर (बागवान/माली) आणि आई म्हणजे चामार परासर पध्दतीत या जातीच्या पूर्वजांची निर्मिती एका तिली स्त्रीच्या पोटी एका पतीकारापासून (पतिकार म्हणजे सिल्कचे कपडे बनविणारा) झाली.

सर मोनीयर विलियम्स यांनी त्यांच्या संस्कृत शब्दकोशात असे वर्णन केले आहे की, या जातीचा जन्म एका क्षत्रीय स्त्रीच्या पोटी एका ब्राम्हण पुरुषा पासून झाला आहे. खरे पहाता वरील विधानाचे महत्व प्रत्यक्ष तथ्या सोबत काहीही संबध ठेवत नाही. परंतु पुरातन लेखकांचे मत या जातीच्या उत्पत्ती विषयी फार मजेदार आहे. तसेच कुंभार या जातीला त्यावेळी त्यांच्या लिखानात महत्वाचे स्थान दिल्या गेले. त्यावेळी समाजातील एका दुबळया घटकालाही सन्मान दिल्या जात होता हेच दिसते. या जातीला ब्राम्हणीय असा आधार आहे की, कृत्य युगात जेव्हा महेश्वराने (शिवा किंवा शंकर) हेमवंताच्या मुलीसोबत लग्नाचा प्रस्ताव ठेवला तेव्हा देव आणि असूर कैलासात किंवा स्वर्गात एकत्र जमा झाले होते. त्या वेळी एक प्रश्न निर्माण झाला की, या लग्न समारंभात आवश्यक असणारी भांडी कोण तयार करणार तेव्हा एका कुलालका नावाच्या ब्राम्हणाला ती भांडी बनविण्याचा आदेश देण्यात आला. त्यावेळी कुलालका सभेसमोर हात जोडून उभा राहिला

व त्याने प्रार्थना किंवा विनंती केली की, त्याला भांडी बनविण्यासाठी लागणारी अवजारे व कच्चा माल पुरविण्यात यावा तेव्हा विष्णूने आपले सुदर्शन चक्र भांडी बनविण्याचे चाक म्हणून उपयोग करण्यासाठी दिले. मंदार पर्वत याचा उपयोग खुंट किंवा खुटा म्हणून करण्यात आला. खुटा म्हणजे कुंभार ज्यावर चाक लावतो व फिरवतो तो होय. भांडयाला आकार देताना खासण्यासाठी पट्टी म्हणून आदिकुरमा (कासव) तर पाण्याचा टाका म्हणून ढगाचा उपयोग करण्यात आला. इत्यादी साधनाचा वापर करून मातीची भांडी तयार केली व ते महेश्वराला त्याचा लग्नासाठी दिली तेव्हापासूनच त्या कुलालकाचे वंशच (समोरची पिढी) कुंभार म्हणून ओळखल्या जातात. महादेवाचा जेव्हा दुर्गेशी विवाह निश्चित झाला, तेव्हा त्याने चार मंगल कलशांची मागणी केली. पण ते कलश बनवायला कुंभारच अस्तित्वात नव्हता. तेव्हा महादेवाने आपल्या दाढीचा एक केस काढला व त्यापासून एक कुंभार निर्माण केला. दुर्गेने त्या कुंभारासाठी एक बायको निर्माण केली. पण ती स्त्री हुबेहुब दुर्गेसारखीच होती. त्यामुळे कुंभार घोटाळयात पडाला, आपली बायको कोणती ते त्याला कळेना ही आपली अडचण महादेवाला सांगितली. महादेव म्हणाला की, 'जिच्या नाकात आणि डोक्यात कोणताच अंलकार नाही ती तुझी बायको समज' कुंभाराला मग आपली बायको चटकण ओळखता आली. तेव्हापासून आजतागायत राढी कुंभारांच्या बायका नाकात व केसात कोणताच दागिना घालीत नाहीत. दुर्गेशी विवाह केल्यावर महादेवाने एक महिना राढी कुंभाराच्या घरी वास्तव्य केले तो वैशाख महिना होता त्यामुळे वैशाख महिन्यात बंगालमधील राढी कुंभार काम करीत नाहीत. जेष्ठ महिन्यात विश्वकर्मापूजा झाल्यावर ते आपल्या कामाला सुरवात करतात. बंगाली कुंभारात अनेक शाखा उपशाखा आहेत. त्या सर्वाचा सामाजिक दर्जा मात्र समान आहे. प्रचलित असलेल्या अनेक दंतकथा प्राह्य वा अप्राह्य मानल्या तरी ऋगवेदात मातीच्या भांड्याचा उल्लेख आहे, त्यावरून कुंभारांचा धंदा अत्यंत प्राचीन काळीही चालू होता एवढी गोष्ट सिध्द होते. भारतात प्राचीन काळापासून तर आतापर्यत अनेक हत्ती दिसून येतात. पाण्यात खेळणे हा हत्तीचा स्वाभाविक गुण आहे. या खेळात ते आपल्या सोंडानी पाणी उचलून डोक्यावर घालतात असे करीत असताना पाण्यासोबत मातीही त्यांच्या डोक्यावर गेली काही वेळाने ती माती सुकली व त्याच्या डोक्याच्या आकाराची भांडी तयार झाली. या भांडयाचा उपयोग धान्य किंवा अन्न व पाणी भरून ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो असा सार कथापासून मिळतो. संस्कृत मध्ये हत्तीच्या डोक्याला कुम्भ असे म्हणतात. अशा प्रकारच्या भांडयाना ''कुम्भ'' हा नाव दिला गेला. या नंतर जेव्हा माणवाने अशा प्रकारची भांडी मातीपासून तयार करणाऱ्याला ''कुंभार'' म्हणतात.

असे म्हटल्या जाते की सृष्टी कर्ता ''ब्रम्हा'' ने मातीचा माणूस तयार केला आणि त्यात प्राण फूकला यामुळे भारतात कुंभाराला ''प्रजापती'' असेही म्हणतात. श्री. टी. एन मुखर्जी म्हणतात की, सर्व प्रथम मातीच्या गढाई विषयी एक मजेदार कथा आहे. देव आणि असुर (राक्षस) हे एकत्र येऊन संपत्ती मिळविण्यासाठी समुद्र मंथन केले. या समुद्र मंथनात त्यांना अनेक बहुमूल्य वस्तू मिळाल्या. देवतांना नेहमीच्या प्रमाणे अमर करणारी वस्तू म्हणजे अमृत ही त्या बहुमूल्य वस्तुतील एक वस्तू होती. अमृत ठेवण्यासाठी एका भांडयाची आवश्यकता होती. स्वर्गीय कलाकार विश्वामित्राने विचार विनिमय करून एकत्रीत झालेल्या देवतांच्या शरीरातून थोडी-थोडी कला किंवा तेजस्व मिळवून त्यापासून एक घडा तयार केला. कला यापासून संस्कृत मध्ये ''कलश'' हा शब्द बनला आहे

**यूरोपीय मत :-** यूरोपीय लेखकांचा मतानुसार आदी मानवाला मातीच्या गुणाची अचानक माहिती झाली. पावसाळयात ओल्या मातीवर त्यांचे पाय पडल्याने त्या प्रकारचे छापे माती वाढवल्यानंतरही तसेच राहते या आश्चर्य-जनक घटनातून त्यांना असे समजले की ओल्या मातीला कोणताही आकार दिला तर तो वाढवल्यानंतरही तोच आकार राहतो. प्राचीन काळी आदी मानवाने पाणी ठेवण्यासाठी खोल वस्तुंचा उपयोग केला. मानव पाणी ठेवण्यासाठी झाडाच्या साली आणि प्राण्यांच्या चांबडयाचा वापर करत होते. सुरवातीला सालीच्या तुकडयात माती दाबून भांडे बनविले जात होते. परंतु काही वेळानंतर भांडयाना आकार देण्यासाठी बांबूच्या टोपलीचा आधार दिला जाऊ लागला. बांबूच्या टोपली सोबत मातीची भांडी उन्हात ठेवने ही समस्या काही काळापर्यंत सुटू शकली नाही. खूप दिवसापर्यंत मानवाला भांडे भाजण्यासाठी अग्नीचा उपयोग माहीत नव्हता. तेव्हा मानवाला अग्नीची माहिती होती तो इतर वस्तू भाजण्यासाठी अग्नीचा वापर करीत होता.

अचानक आधी सारखे मातीचे भांडे भाजण्यासाठी आगीचा शोध लागला. त्या काळी झोपडया गवताने झाकलेल्या राहत होत्या आणि अचानक एक दिवस एका झोपडीला आग लागली झोपडीमधल्या सर्व वस्तू जळल्या त्यामध्ये उन्हात वाढविलेली मातीची भांडी सुध्दा होती. त्यांना पाहून नवलच वाटले की, ही भांडी आगीत जळाल्याने जास्त मजबूत झाले. भांडयाना आधार असलेले बांबूच्या टोपल्या जळल्या त्याच्या खूणा भांडयावर पडलेल्या होत्या. हया घटनेनंतर लागलेल्या शोधामुळे मानवाने भांडे भाजण्याचा विचार केला. आज पण वस्तू संग्रहालयात बांबूच्या टोपलीचे खुणा असलेले भांडयाचे तुकडे पहायला मिळतात. हेच कुंभार कलेचे ऐतिहासिक प्रमाण आहेत.

अनेक काळापर्यंत कुंभार हाताने भांडी बनवत होता. यासाठी त्यावेळी कुभांराने बांबुचा टोपलीचा आधार देऊन बत्तीस भांडे बनविण्याचे प्राविण्य मिळविले होते. त्यावेळी कुंभारी चाकाचा कोणीतरी शोध लावला असेल परंतु त्याचा पत्ता कोणालाच माहित नाही आणि आता आम्हीपण सांगू शकत नाही की कोणत्या वेळेपासून चाकाची सुरवात झाली.परंतु मिश्रच्या हमरोबीच्या गुम्बजो या चित्रकारी मधून चाकावर केलेल्या कुंभार कामाचा पत्ता मिळतो. यातून हे दिसून येते की १०,००० इ.स. पूर्वच्या आधी कुंभारी चाकाचा उपयोग झाला नव्हता. प्राचीन कुंभारीच्या सुरवातीचे ठिकाण मिश्री येथे त्यावेळी फुलदान्या आणि मुर्त्या बनवत होते.

**भारतातील कुंभार कलेचा इतिहास किंवा भारतातील कुंभार कामाचे मुळ :**भारतात प्राचीन काळा पासून अनेक संशोधन झाले आहेत. त्यात असे दिसून आले की, मानवी सभ्यतेच्या आंरभिक काळापासून भारतीयांना कुंभारी कलेचे ज्ञान होते. असे म्हटल्या जाते की हजार वर्षा पूर्वी भारतीय कुंभार मातीचे खेळणे बनवून त्यांच्यात प्राण फूंकत असे. या कथेनुसार असा अंदाज लावल्या जाऊ शकतो की, आज पासून १०,००० वर्षा पूर्वी भरतात मातीपासून वस्तू बनविण्याची कला अवगत होती. अनेक पश्चिमी लेखकांचे म्हणणे आहे की, कुंभारी कला हिंदुस्थानातून पोटोमिया, बेबिलान इत्यादी देशात गेली आहे. कारण या देशांमध्ये भारतात असलेल्या वस्तुसारख्या मिळत्या-जुळत्या वस्तू दिसून येतात. मोहनजोदडो व हडप्पा येथील उत्खननात सापडलेल्या प्राप्त अनेक मातीची भांडी ३,००० ई. पू. जुने आहेत. या भांडापासून असे अनुमान करता येते की, त्या वेळी कुंभारी कलेने प्रविण्यता प्राप्त केली होती. भारतीय अजब बंग्लानमध्ये असलेल्या मातीच्या भांडयावरून असे दिसून येते की, सिंधू घाटीच्या सभ्यतांमध्ये कुंभारांनी कुंभारी कलेमध्ये श्रेष्ठता प्राप्त केली होती. भांडयावर केलेली नक्षीकामे व चित्रकारी ही त्यांच्या श्रेष्ठत्वाचे माप आहे. त्या वेळी चाकावर भांडी तयार केली जात असे आणि चाकावर काम करण्यात

कुंभारांनी प्राविण्यता प्राप्त केली होती. चार वेदामध्ये ऋगवेद सर्वात जुना वेद आहे त्यात २,००० ई.पू. ते ३,००० ई. पू. मध्ये मातीच्या भांडयाच्या उपयोगा बद्दल उल्लेख आहे. ई. पू. आठव्या आणि नवव्या शतकतात मनुष्यशास्त्रात केलेल्या वर्णनावरून अधिक माहिती प्राप्त होते भारताच्या इतिहासात कुठेही ग्लेज भांडाच्या उल्लेख आढळूण येत नाही.

जे. एस. पी. आणि डी. टी. एन केंद्राने आपल्या सिरामिक्स या पुस्तकात लिहीले आहे की चीनच्या स्यू वंश यांनी भारतातून नेले. याचाच अर्थ असा की हिंदुस्थानियांना काच आणि ग्रलेजच्या बाबतीत माहिती होती. परंतु लिहलेल्या नसल्यामुळे हे सर्व व्यर्थ आहे. मुसलमानांनी भारतावर आक्रमण करून सन १००० पासून काही काळापर्यंत भारतावर राज्य केले होते. त्यांनी आपल्या सोबत अनेक कला आणि हस्तकला यांची माहिती आणली होती. त्यात चीनी मातीपासून कलात्मक भांडी तयार करण्याची कला होती. क्रिश १२ व्या शतकामध्ये मुसलमान राजांनी आपल्या देशामधून कुंभाराना हिंदुस्तानात आणून बसविण्यासाठी सांगितले. हया कुंभारानी विशेष करून परशियावाला लाल मातीच्या भांडयावर नरला मिश्रीत रंग लावून प्राविण्य मिळविले. आज सुध्दा दिल्लीच्या पुरातन किल्ल्याच्या घुमटावर या रंगाचे छोटे-२ कलात्मक कवेलू पहायला मिळतात. चित्रामध्ये भरलेले रंग परशियामध्ये प्राप्त केलेले रंगाचे प्रमाण आहे. जोधपूरच्या जवळ राजस्थानच्या एका उत्साही महाराजाने अरब देशातून कुंभारांना बोलविले आणि ग्लेजवाले अनेक कलात्मक भांडे आणि कवेलू बनविले. उत्तर प्रदेशातील चिनहट दक्षिणमधील तामिलनाडूच्या आरकट जिल्हयातील कारागीर गावात आपल्या परंपरागत चालीनुसार लाल मातीच्या भांडयावर ग्लेज करण्याच्या पध्दतीला आजही मान्यता आहेत. आजमगढ आणि उत्तर प्रदेशामध्ये निजामाबादच्या काळया मातीच्या कुंभार कामावर भारत देशाला गर्व आहे. आजही तेथील भांडी हलकी आणि उत्कृष्ट व कलात्मकतेसाठी प्रसिध्द आहेत. त्या भांडयावर तेथील रंगावर स्तुतीजन्य चित्रकारी केलेली आहे आणि भाजल्यानंतर हया भांडयावर विशेष आकर्षक काळा रंग येतो.भाजण्याच्या अगोदर हया भांडयावरील नक्षीकामावर किंवा चित्रांमध्ये चांदीचा रंग भरून हलकासा हात फिरविला जातो. यामुळे काळया रंगावर आकर्षक चांदीचा पांढरा रंग वर येतो.

**इतर देशातील कुंभार कलेचा इतिहासः**पूर्व ऐतिहासिक काळापासूनच पूर्वमध्ये, पूर्व आणि मेलटीवेरावेन व्दिपचा अनेक देशांनी कुंभारी कला एशिया मॅनर कडून शिकली असेल आणि भारताने याच काळात ही कुंभारी कला शिकली असेल.

**असरिया व बॅबिलॉन मधील कुंभारी कला किंवा कामः** असरिया व बॅबिलॉन पूर्व ऐतिहासिक काळापासूनच कलात्मक व उच्चकोटीची कुंभारी भांडयासाठी अधिक प्रसिध्द राहीला आहे. या देशातील कुंभारांना लाल मातीच्या भांडयावर मीनाकारीचा काम करण्याची कला अवगत होती. हेराडोटसच्या म्हणण्यानुसार मीडिया मध्ये एक बहास गावातील भींतीवर किंवा भींत सात रंगाने सजवली गेली आहे. असरिया शासन काळात विटावर चित्रकारी केली आहे.

**चीन देशातील कुंभारी कलाः** असे मानले जाते की, २०० वर्ष ई. पू. ध्योग-टी-स्वींगच्या शासन काळात चीन या देशात कुंभाराने भांडी तयार केले होते. त्या काळात भांडी भाजल्यानंतर पांढरा रंग लावण्यासाठी ज्या मातीचा वापर करीत होते, त्या मातीला ''क्वालिंग'' म्हणतात.पोर्सिलेनचे भांडी (चीनी मातीचे भांडे) टांग वंशच्या काळात सन ५१८ ते सन ६१८ मध्ये सर्व प्रथम बनविली गेली. टांग-वंश सन १२०० मध्ये अनेक रंगाचे पोर्सिलेन भांडे बनविण्यात प्राविण्यता प्राप्त केली होती. प्रसिध्द यांत्रिक मार्कोपालोने सन १२६८ मध्ये त्यांनी लिहीलेल्या आपल्या यात्रा रिपोर्ट मध्ये पोर्सिलेन शब्दाचा उल्लेख केला आहे.कुंभारी कले प्रती निरूत्साही झाल्याने सन १६४४ ते सन १६१२ काळात कुंभारी कला क्षीण होत गेली. नंतर १२ वी शताब्दी मध्ये कोरियन जपान व यूरोपीय देशानी चीन देशातील कुंभारी कला अवगत केली किंवा स्विकारली.

**जपानची कुंभारी कलाः**इतर देशा प्रमाणेच जपान मध्ये कुंभारी कलेची सुरवात शिल युगाच्या सुरवातीला झाली होती. याचे अनेक प्रमाण मिळतात. प्राचीन महालामध्ये मातीच्या भांडयाचे तुकडे दिसून येतात. जपान मध्ये अधिक जुनी सिरॅामिक कलेची निशानी आहे. या निशाना वरून प्राप्त मातीच्या भांडयाना दोन भागात विभागता येते १. जेमून नमूना, ही हातानी बनविले भांडी आहेत. २. यौवई नमूने हे कुंभारांनी चाकावर बनविलेले मातीचे भांडे, हे जपानमध्ये अधिक प्राचीन आहेत. जेमून नमूना ही हातानी बनविले भांडी आहेत. ही भांडी त्या काळामध्ये असणाऱ्या भांडया मध्ये प्राचीन होते. जेमन नमूने अनेक आकाराचे बनविले जात होते. यौवई नमूनेचे भांडी उत्कृष्ट आकार व आकर्षक शोभेची भांडी आहेत. याच काळात नमूने कमी तापमानावर पकविण्यासाठी लाल मातीचा उपयोग केला जात होता. या भांडयाना ''सूयाकी'' म्हणतात. याना ग्लेज म्हणत नाही. आजही बुध्द मंदीरात व शिन्टो मध्ये भगवान व आत्म्यांना तांदुळा पासून बनविलेली दारूला प्रसाद म्हणून चढवितात. तेव्हा ही दारू ठेवण्यासाठी सूर्याकी भांडयांचा वापर करतात.

**कुंभार हा गावाचा पालकः**जुन्या काळाप्रमाणे सध्यास्थितीत शेतकरी वर्गाकडून कामाच्या मोबदल्यात सतत काही दिल्या जात नाही किंवा वस्तू विनिमय केल्या जात नाही. परंतु काही प्रसंगी मात्र कुंभार शेतकऱ्यांना काही भांडी देतो. त्याच्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून त्याला धान्य मिळते. अक्तीच्या दिवशी हंगामाच्या सुरवातीला गावातील कुंभार प्रत्येक शेतकऱ्याला पाच भांडी व त्यावर झाकण्यासाठी झाकणे देतात व त्याच्या मोबदल्यात अडीच पायल्या धान्य घेतो. (पायली हे धान्य मोजण्याचे एक माप होय.)या भांडयातील एका भांडयात प्रत्येक शेतकरी पाणी भरून ब्राम्हणाला भेट म्हणून देतो व बाकीचे स्वतःसाठी ठेवतो. लग्न समारंभाचा वेळी वर पक्ष वधूला कुंभारीनच्या घरी सोहाग विधी करण्यासाठी घेवून जातो. कुंभार हा त्या वधूला भांडे बनविण्याच्या चाकावर बसवून तिला सात वेळा फिरवित असे. कुंभारीन त्या वधूला सात भांडी भेट म्हणून देत असे. त्या भांडयामध्ये पाणी भरून ठेवल्या जात असे, त्यालाच सात समुद्र समजल्या जाते. या सात भांडयापैकी जर दोन भांडी अपघाताने फुटली तर असे समजल्या जाते की, वर व वधु त्यांच्या भावी जीवनात एकमेकांसोबत भांडणे होतील हा प्रचलीत असनारा परंतु एक दंतथेचा भाग आहे. या भांडयाच्या भेट वस्तुच्या मोबदल्यात कुंभारीनला भेट म्हणून कपडे दिले जात. प्रेतयात्रेच्या वेळी घाट म्हणून कुंभार तेरा भांडी पुरवितो. यावेळी घरची जुनी मातीची भांडी फोडल्या जाते. हंगामाच्या वेळी कुंभार शेतकऱ्याला शेतावर नवीन भांडी नेऊन देतात. या प्रथेतून असे निर्देशीत केल्या जाते की, कुंभार हा शेतकऱ्यांचा किंवा समाजाचा अविभाज्य घटक आहे.

**मातीच्या भांडयांचा घरगुती वापर:** प्राचीन काळापासून तर आजपर्यंत दैनंदिन जीवनात मातीच्या भांडयाचा वापर केला जात असल्याचे दिसून येते. सुरवातीच्या काळात मातीच्या भांडयांचा वापर मोठया प्रमाणावर केला जात होता. कालांतराने मात्र त्याचा वापर कमी झाला असला तरी पण आजही मातीची भांडी घरगुती वापरात असल्याचे दिसून येते. मातीच्या वस्तुला प्लास्टीकच्या वस्तू पर्याय म्हणून वापरली जात असली तरी थंड पाण्यासाठी प्लास्टीकची भांडी वापरू शकत नाही आजही उन्हाळयाच्या दिवसात थंडपाण्सासाठी जवळपास प्रत्येक घरात थंड पाण्यासाठी मातीची मडके वापरतात. तसेच मातीच्या भांडयातील पाणी पिल्यामूळे अन्न पचन चांगले होते असे आर्युवेदीक वैद्याचे मत आहे. ज्याला कॉन्स्टीकेसनचा त्रास असेल त्याला वैद्य सांगतात की मातीच्या भांडयाच्या किंवा चांदीच्या भांडयात अन्न शिजवून खा. पण चांदी महाग असल्यामूळे चांदीच भांडयात अन्न शिजवून खाणे अशक्य आहे. त्यामूळे लोक मातीच्याच भांडयाचा पूर्वी वापर करीत असत. फुलझाडे लावण्यासाठी मातीच्या कुंडयांचा वापर केला जातो. मातीच्या गल्ल्याचा किंवा चोर भांडाचा उपयोग सुटे पैसे गोळा करण्यासाठी केला जातो. घरामध्ये धुप जाळण्यासाठी मातीचे धुपाटणे वापरल्या जातात. देवघरात दिवा लावण्यासाठी मातीच्या पणत्याचा वापर केला जातो. धान्य साठविण्यासाठी मातीच्या मोठया मडक्याचा वापर केला जातो. दुध नासू नये म्हणून आजही ग्रामीण भागात मातीच्या भांडयाचा उपयोग करतात. त्याच प्रमाणे अन्न नासू नये यासाठी सुध्दा विशिष्ट व विभिन्न आकाराच्या मातीच्या भांडयाचा वापर केला जातो. अन्न शिजविण्यासाठी मातीच्या चुलीचा वापर केला जातो. आनंद भांडारमध्ये दही (मिस्की) मातीच्याच भांडयात विर्जन घालून मातीच्याच भांडयात दही दिल्या जातो. बंगालमध्ये चहा सुध्दा मातीच्या भांडयात दिला जातो. आजही ग्रामीण भागात आंबील आबोवण्यासाठी पसरट मातीच्या भांड्याचा उपयोग केला जातो त्यामुळे त्याला चांगल्या प्रकारची चव येते. माती पासून अनेक शोभेच्या वस्तू तयार करून घरात ठेवल्या जातात. कुंभारांनी मातीचा फिल्टर तयार केला आहे. त्यामुळे त्यातून शुध्द पाणी मिळू शकते. आधुनिक कारखान्यात तयार झालेल्या फिल्टरला या पर्यायी वाटर फिल्टरने ग्रामीण भागातील स्वच्छ पाण्याची उणिव भरून काढली आहे.

**मातीच्या भांडयाचे धार्मिक महत्व:** भारतीय संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती असून एक विशिष्ट असा वारसा असलेली संस्कृती आहे. परंपरेनुसार यात विविध वस्तूला फार धार्मिक महत्व आहे. परंपरेनुसार विविध वस्तू वापरल्या जातात. अगदी मृत्यूचा शेवटीच्या विधी पार पाडण्यासाठी सुध्दा विविध मातीची भांडी वापरून पुर्ण केली जाते. मनुष्य मरण पावल्यानंतर त्याचा जो अंत्य विधी केल्या जातो. त्यावेळी मातीच्या मडक्याचा उपयोग अग्नी नेण्यासाठी केला जातो. नवीन मातीच्या मडक्यात पेटलेल्या गोवऱ्या भरून नेतात. ही एक फार प्राचीन भारतीय परंपरा आहे. त्याचा वापर आजही केला जातो. लग्नविधीच्या प्रसंगी सूध्दा मातीच्या भांडयाचा वापर केला जातो, त्या भांडयाना अहीग म्हणतात. त्यात मातीची छोटी-छोटी गाडगे व त्यावर झाकणे असतात. याच प्रसगी मातीच्या चुलीला धार्मिक महत्व आहे. मंडप पुजनच्या दिवशी पापड व वडे या मातीच्या चुलीवर तळतात. वर वधुला आंघोळ घालण्यासाठी घगाळ पाणी ठेवण्यासाठी वापराता. आजही नागपूरच्या विवाह मंडळ हॉलमध्ये मंगळ मातणी म्हणून मातीच्याच भांडयाला पांढरा व गेरवा रंग देऊन वापरल्या जाते. कारण त्याला धार्मिक दृष्टीने पवित्र मानल्या जाते. देवाला खापरी करण्यासाठी मातीचे पसरट येळणी वापरली जाते. आणि लग्न समारंभात त्याचा वापर केला जातो. आधुनिकीकरण झाले असले तरी हळदीच्या दिवशी त्याच वापरल्या जातात. धुपाटने सूध्दा मातीचे वापारले जातात कारण त्यात निखारे व त्यावर राळउद घातल्यानंतर ते देवासमोर फिरवले जाते. ते मातीचे असल्यामूळे ते गरम होत नाही व हाताने सहज धरता येते.

पोळयाच्या सणाला मातीचे बैल बनवितात. बैलाचे पाय धुण्यासाठी मातीच्या गाडग्याचा वापर केला जातो. दिवाळी हा उजेड किंवा प्रकाशाचा सण मानला जातो. यावेळी दिवे म्हणून मातीच्या पणत्याचा वापर केला जातो. लक्ष्मी पुजनासाठी मातीची लक्ष्मीची मुर्ती पुजल्या जाते. आटीत या सणाच्या वेळी सौभाग्याचे प्रतीक म्हणून स्ि‍त्रया मातीची छोटी मडकी पुजतात. अक्षय तृतीयेला (तिजेच्या सणाला) कळसे व त्यावर छोटी करूली पितृ पुजनाच्या हेतुने पुजण्याकरीता वापरतात. आश्विन पोर्णीमेला मातीच्या शंकर पार्वतीच्या मुर्तीची (भुलाबाईची) पुजा करतात. जन्माष्टमीला कृष्णाच्या मातीच्या मुर्त्या तसेच गणेश चतुर्थीला गणेशाच्या मातीच्या मुर्त्या व नवरात्रीला दुर्गा शारदेच्या मातीच्या मुर्त्या तयार करून पुजतात. हिवाळ्यातील महत्वपूर्ण सणांपैकी एक सण म्हणजे मकरसंक्रांतीच्या सणावरून लक्षात येईल. मकरसंक्रांतीच्यावेळी मातीची भांडी सुगडयाचे वाण सवासीन स्त्रीला हळदी कुंकाच्या वेळेला ते वाण म्हणून देत होते. त्याचा उपयोग घरातील काही पदार्थ साठविण्यासाठी केले जात होते. पूर्वी त्या छोट्या मडक्यामध्ये हळद, तिकट. मीठ ठेवायचे. ग्रामीण अर्थव्यवस्था स्वंयपूर्ण निर्माण करण्यास सुतार लोहार, चर्मकार, शींपी, धोबी, गवंडी त्याच प्रमाणे कुंभार मातीच्या संसाराला उपयोगी वस्तू निर्माण करून खेडे स्वंयपूर्ण करण्यात महत्वाचे योगदान देत होता. म्हणजेच कुंभार हा ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेला स्वंयपूर्ण करणारा महत्वाचा घटक होता व आजही तो टिकून आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१ अग्निहोत्री, द. ह. अभिनव मराठी शब्दकोष व्हीणस प्रकाशन, पुणे
२. डॉ. कदम, ना. धो. महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य प्रतीभा प्रकाशन पुणे
३. कांबळे, व. काशाळीवार आदिवासी भारत अनिल कुमार मेहता अजब पुस्तकालय, कोल्हापूर
४. कुलकर्णी, कृ. पा. मराठी उत्पत्ती कोष, व्हीनस प्रकाशन पुणे
५.कुलसंगे, ब. सि. अस्मिता दर्शक सौ. पोर्णिमा व. कुलसंगे. वीर बापुराव नगर, गडचिरोली
६. कोचोळे, दा. घो. सामाजिक संसोधन पध्दती श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
७. गर्गे स. पा. (संपादक) भारतीय समाज विज्ञान कोष समाज विधान मंडळ, पुणे
८. गोखले, शरदचंद्र कामगार कल्याण विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पुणे
९.डॉ. गोरे गोविंद, श्री. सोनवणे, उत्तमराव आदिवासी कालविश्व आदिवासी संसोधन प्रशिक्षण संस्था पुणे
१० मीरमीरा, एस. के. भारतीय कुंभारी कला
११डॉ. हडप गो. नि. कामगार विश्व दशा आणि दिशा रसिकराज प्रकाशन नागपूर